मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन(स्मार्ट)प्रकल्प,पुणे
दूरध्वनी क्र.- ०२० २५६५६५७७/७८
ईमेल - pcmu.smart@gmail.com
शेती महामंडळ भवन, २७०, भांबुर्डा,
सेनापती बापट मार्ग,पुणे-१६.

क्र.प्रसव्यक/उपप्रकल्प/११३४ /२०२३ दि.२२ /०६/२०२३

प्रति,

प्रमुख,पीआययु,
कृषी,पशुसंवर्धन,माविम,MSRLM व VSTF

**विषय:-सिबिओ अध्यक्ष/संचालक यांचे हमीपत्रासह सविस्तर प्रकल्प अहवाल मंजुरीसाठी सादर करणेबाबत...**

संदर्भ:- मा.प्रकल्प संचालक,स्मार्ट यांचे आदेश.

उपरोक्त विषयान्वये स्मार्ट प्रकल्पातील सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी प्राथमिक मान्यता दिलेल्या सीबीओंनी सविस्तर प्रकल्प अहवाल मंजूरीसाठी सादर करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने प्राथमिक मान्यता मिळालेल्या सिबिओने CA यांच्या मदतीने सिबिओकडे कृषी मालाच्या उपलब्धतेनुसार व बाजाराभिमुख व्यवसाय करणेसाठी उपलब्ध कच्चा माल, उत्पादित मालाची बाजारपेठेनुसार मागणी, सिबिओ सभासद यांची मागणी/अनुकुलता इ. बाबींचा विचार करून आवश्यक क्षमतेचे घटक सर्वानुमते प्रस्तावित करणे आवश्यक आहे.

२. तथापि या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे कि, मंजूर सविस्तर प्रकल्प अहवाल असलेल्या बऱ्याचश्या संस्था या उपप्रकल्प मंजुरीनंतर अंमलबजावणी करणेऐवजी मंजूर उपप्रकल्प किंवा घटक हे बदलून/सुधारित/वाढ करून घेण्यासाठी कार्यरत आहेत. यामुळे संस्थेतील व प्रकल्पातील उपलब्ध मनुष्यबळ /यंत्रणेचा योग्य वापर होत नसून त्याचा प्रकल्पावर /प्रकल्पाच्या उद्दिष्ट्य साध्यतेवर प्रतिकूल परिणाम होत आहे.

३. त्यामुळे राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजुरी समिती बैठक क्र.१५ मध्ये सादर केलेले व यापुढे सादर होणारे सर्व सविस्तर प्रकल्प अहवाल हे सिबिओ अध्यक्ष/संचालकांचे सोबतच्या नमुन्यात हमीपत्रासह सादर करणे अनिवार्य आहे. हमीपत्राशिवाय सविस्तर प्रकल्प अहवालाला मान्यता मिळणार नाही याबाबत सर्व संबंधितांना अवगत करावे.

सोबत:- सिबिओ अध्यक्ष/संचालकांचे हमीपत्र नमुना.

(कौस्तुभ दिवेगावकर भा.प्र.से.)
प्रकल्प संचालक,स्मार्ट

D:\SMART AMOL\MANE\LETTERS 2023-24.Docx Mane/87

सिबिओ अध्यक्ष/संचालकांचे हमीपत्र

आम्ही खालील सह्या करणारे ----------------------------------------(संस्थेचे नाव व पत्ता) या संस्थेचे अध्यक्ष/संचालक असून आमच्या संस्थेकडून स्मार्ट प्रकल्पामध्ये सादर करण्यात येणारा हा उपप्रकल्प व त्यामधील प्रस्तावित सर्व घटक हे सर्वानुमते, आमच्या आवश्यकता/क्षमता,उपलब्ध कच्चा माल तसेच बाजारपेठेची मागणी इ. सर्व बाबींचा परीपूर्ण विचार करून प्रस्तावित केलेला/केलेल्या आहेत. सबब सदर मंजूर उपप्रकल्पानुसार आम्ही अंमलबजावणी करणेस बांधील असून मंजुरीनंतर त्यामध्ये बदल/वाढ/सुधारणा हि मंजुरीसाठी प्रस्तावीत करणार नाही याची आम्ही हमी देत आहोत.

| अ.क्र. | संस्था पदाधिकारी यांचे नाव | पद | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |

ठिकाण-
दिनांक-